-: प्रेस नोट :-

**राज्यातील विविध जिल्हयातुन व परराज्यातुन चोरी केलेल्या ॲप्पल मोबाईलची खरेदी करून त्यांचे ॲप्पल आय.डी. रिमुव्ह करून मोबाईल परदेशात विक्री करणाऱ्या तसेच चोरीच्या मोबाईलचे पार्टस् वेगवेगळे करून विक्री करणाऱ्या टोळीस माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी अटक केलेबाबत.**

मा.र.आं.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे ॲप्पल मोबाईल चोरीचा गुन्हा मे २०२६ मध्ये नोंदविण्यात आला होता. मोबाईल चोरीच्या गुन्हयात केलेल्या तांत्रिक तपासावरून चोरीच्या मोबाईलमध्ये एका सिमकार्डचा वापर झालेला मिळून आला. त्यावरुन केलेल्या सखोल तांत्रिक तपासात चोरीच्या मोबाईलमध्ये सिमकार्ड वापर करणाऱ्या आरोपीचा शोध घेवून त्याच्याकडून चोरीचे २१ ॲप्पल मोबाईल व १२ सिमकार्ड हस्तगत करण्यात आले. त्यावरून गुन्हयामध्ये केलेल्या पुढील तपासामध्ये राज्यातील विविध जिल्हयातून व परराज्यातुन चोरी केलेले ॲप्पल मोबाईल खरेदी करून त्याचे ॲप्पल आय. डी. रिमुव्ह करून ते परराज्यात व परदेशात विक्री करणारी तसेच ॲप्पल आय.डी. रिमुव्ह न झाल्यास चोरीच्या मोबाईलचे सर्व पार्टस् वेगवेगळे करून ते मार्केटमध्ये कमी किमतीत विक्री करणाऱ्या टोळीतील ०४ आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून चोरीचे **एकूण ६४ ॲप्पलचे मोबाईल** व २० चोरीच्या मोबाईलचे वेगवेगळे केलेले मिडल बॉडी, डिस्प्ले, बॅटरी, मदरबोर्ड, लॉजीक बोर्ड असे **एकूण ४४,७८,४००/- रू.किंमतीचा मुद्देमाल** हस्तगत केला असून चोरीचे मोबाईल हस्तगत करून त्यापैकी तेलंगणा - ११, दिल्ली -३, महाराष्ट्र/मुंबई - १९, कर्नाटक - २, राजस्थान- 1, तमिळनाडु - 1, उत्तराखंड - 1 येथिल गुन्हे उघडकीस आणले. सदरची कामगिरी ही श्री. शैलेश बलकवडे, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री. मनिष कलवानिया, पोलीस उप-आयुक्त, दक्षिण परिमंडळ १, मुंबई, श्री. निलेश बागुल, सहाय्यक पोलीस आयुक्त, आझाद मैदान विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अनिल मुळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. फरिद खान, पोलीस निरीक्षक (गुन्हे), मा.र.आ मार्ग पोलीस ठाणे यांचे नेतृत्वाखाली स.पो.नि. सुशिलकुमार वंजारी, स. पो.नि. जालिंद्र लेंभे, पो उ.नि. राजु साळुंखे, पो.उ.नि. अमोल चौरे, पो.ह.क्र. ९७०७६६/प्रशांत चव्हाण, पो.ह.क्र. ०३०८४०/किरण घाग, पो.ह.क्र. ०४११२७/प्रविण पवार, पो.ह.क्र. ०६१३२/प्रकाश वाघ, पो शि.क्र.१४०६४९/भागवत पाखरे, पो.शि.क्र. १४१२१३/सागर हेमाडे, पो. शि.क्र १४०५०३/समिर साळवे, पो.शि.क्र. १४००५९/विरेश कोराळे या पथकाने केली आहे.

--oo--